## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.४९२/२०१६ मधील
## निशाणी क्र.४९ वर आदेश
**CNR-MHLA110009662018**

१. सदरचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ व कलम १५१ खालील तरतुदीनुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रकरण प्रलंबित असताना न्यायालयाच्या आदेशानुसार प्रकरणामध्ये कोर्ट कमिशनरची नेमणुक करण्यात आलेली होती. त्यानुसार कोर्ट कमिशनर यांनी मोजणीबाबत अहवाल दाखल केलेला असुन सदर अहवालामध्ये प्रतिवादी क्र.५ ते ९ यांनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केल्याचे दाखविले आहे. सदर अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादींनी प्रतिवादी क्र.५ ते ९ यांच्याकडे मागणी केली असता सदर प्रतिवादींनी अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा वादींना दिलेला नाही. त्यामुळे त्याअनुषंगाने दाव्यामध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार नसुन प्रस्तावित दुरुस्तीद्वारे पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याची वादींनी शेवटी विनंती केलेली आहे.

२. सदर अर्जाला प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील मागणी योग्य व कायदेशीर नाही. सदर प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार असल्यामुळे अर्ज चालु शकत नाही. अर्जात नमुद मोजणी

चुकीची आहे. त्यामुळे त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची सदर प्रतिवादींनी शेवटी मागणी केलेली आहे.

३. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी नि.क्र.५१ ला म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील मागणी योग्य व कायदेशीर नाही. अर्जात नमुद मोजणी ही चुकीची व बेकायदेशीर आहे. अर्जातील मागणीबाबत वादी हे स्वतंत्ररीत्या दाद मागु शकतात. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होणार आहे. त्यामुळे अर्ज चालु शकत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची सदर प्रतिवादींनी शेवटी मागणी केलेली आहे. प्रतिवादी क्र.९ ने म्हणणे न दिल्यामुळे अर्ज प्रतिवादी क्र.९ च्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात येत आहे.

४. सदर अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्याकरिता मी खालील मुद्दे विचारात घेतले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात नमुद प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी आवश्यक आहे का? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

५. सदर प्रकरणातील पक्षकारांतर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र.१ करिता</u> –**

६. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादींनी मालकी जाहीर करुन मिळण्याकरिता व निरंतर मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.६ ते ९ यांनी कैफियत दाखल करुन दाव्यातील मागणी स्पष्टपणे नाकारलेली आहे. सदर दावा प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुद्ध विनाकैफियत पुढे चालविण्यात येत आहे. सदर प्रकरणामध्ये मुद्दे काढण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणामध्ये वादींनी नि.क्र.४३ ला साक्षीदार क्र.१ चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रकरण अंशतः सुनावणीकरिता प्रलंबित असल्याचे स्पष्ट होते. परंतु, प्रकरणातील वादींच्या साक्षीदाराची प्रतिवादींतर्फे अद्याप उलटतपासणी घेण्यात आलेली नाही.

७. तसेच सदर प्रकरणातील कागदपत्रांवरुन याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, सदर प्रकरणातील पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन नि.क्र.२८ वरील आदेशानुसार प्रकरणातील पक्षकारांच्या मिळकतीच्या संयुक्त मोजणीसाठी तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, शिरुर अनंतपाळ यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. त्यानंतर कोर्ट कमिशनर यांनी दि.२०/०८/२०१८ रोजी मोजणी अहवाल प्रकरणात दाखल केलेला आहे. सदर मोजणी अहवालाच्या आधारे प्रस्तुतचा अर्ज वादींनी दाखल केलेला आहे.

८. सदर अर्जाद्वारे वादी हे अतिक्रमणाबाबत दाव्यात कथन करुन दाव्यामध्ये अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्याबाबतची अतिरीक्त दाद समाविष्ट करु ईच्छीत आहे. त्यामुळे याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, केवळ वादींनी

अतिक्रमणाबाबत दाव्यात अतिरीक्त कथन केल्यामुळे व त्याबाबत दाद मागितल्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होत नाही. याउलट पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरिता व प्रकरणाची संख्या टाळण्याकरिता अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास वादींना परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादींना दुरुस्तीबाबत बचाव मांडण्याची संधी मिळणार आहे. तसेच सदरचा अर्ज नामंजुर केल्यास प्रकरणामध्ये गुंतागूंत वाढुन प्रकरणाची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वादींचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर दाव्याचे स्वरुप, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी अर्जात नमूद प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्यामध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करिता</u> –**

९. वर नमुद चर्चेवरुन व प्रकरणात दाखल कागदपत्रावरुन स्पष्ट होते की, प्रकरणामध्ये कोर्ट कमिशनर यांनी दि.२०/०८/२०१८ रोजी अहवाल दाखल केलेला असताना देखील प्रस्तुतचा अर्ज वादींनी साधारण एक वर्षाच्या विलंबाने दाखल केलेला आहे. तसेच वादींनी पुरावा दाखल करण्याकरिता वेळोवेळी मुदती देखील घेतलेल्या आहेत. वादींनी दि.२०/०८/२०१८ रोजी अहवाल दाखल केल्यानंतर लगेच प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असता तर प्रकरण निकाली निघण्यास विलंब झाला नसता. सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास आणखी विलंब होणार आहे. सदरचा विलंब खर्चाच्या स्वरुपात भरुन काढणे देखील महत्वाचे आहे.

त्यामुळे सदरचा अर्ज वादींवर खर्च बसवुन मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि.क्र.४९ वरील अर्ज खालीलप्रमाणे वादींवर रक्कम रु.९००/– खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमुद खर्चाची रक्कम वादींनी पुढील तारखेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ते ९ ला प्रत्येकी रु.१००/– प्रमाणे द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

३. वादींनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे मूळ दाव्यामध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

स्वा/–
(शिवकांत म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.

दि.१६.१२.२०१९.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.N. Yenge |
| Name of the Court | : Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : 16.12.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : 16.12.2019 |
| Judgment/Order uploaded on | : 17.12.2019 |